श्री निळकंठेश्वर मंदिराच्या जतन, संवर्धनाला सर्वोतोपरी सहाय्य - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार
>> पान 2

शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'
>> पान 3

कवयित्री रेश्माई खरात यांच्या १२व्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन
>> पान 4

**सुविचार**
आपले ध्येय निश्चित ठेवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 91 ■ मंगळवार, दि. 04 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




मायरामध्ये रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिका साकारणार, श्रीवल्ली पहिल्यांदा करणार ॲक्शन...
आतील पान

## ईव्हीएमच्या आडून नरेटिव्ह सेट करण्याची धडपड

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी ईव्हीएमच्या विरोधात आवाज उठवणे सुरु केले आहे. त्यासाठी वेगवेगळे मोर्चे, सादरीकरणे आणि कागदपत्रे दाखवत नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न सुरु झाल्याचे दिसते.

अलीकडेच आ. आदित्य ठाकरे यांनी कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पावलावर पाऊल ठेवत मतदार यादीतील घोळासंदर्भात एक प्रेझेंटेशन दिले. त्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही एक मेळावा घेत ईव्हीएम मशीनमध्ये कसा घोळ होतो याचे सादरीकरण केले. यासाठी त्यांनी प्रतिकात्मक ईव्हीएम मशीनही तयार करवून घेतल्या होत्या. त्या ईव्हीएम मशीनमध्ये मतदाराने मतदान केल्यावर कशी पावती बाहेर येते किंवा येत नाही वगैरे वगैरे अशा अनेक मुद्यांवर हे सादरीकरण करण्यात आले, ज्याचा अर्थाअर्थी संबंध लागत नव्हता. विशेषत: ''लोक आपल्याला मतदान करतात, पण ईव्हीएमच्या भानगडीमुळे आपला पराभव होतो,'' अशी प्रचितीही राज ठाकरे यांना यावेळी झाली.

गेल्या १०-१२ वर्षांपासून ईव्हीएमध्ये हा घोळ सुरु असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मात्र, लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या बहुमतावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली नाही. लोकसभेत मविआचे उमेदवार ईव्हीएमच्या() घोळामुळेच निवडून आलेत का? असाही प्रश्न त्यांच्या या सादरीकरणातून उपस्थित होतो.

कुठल्याही निवडणूकीनंतर अनेक महिने घराबाहेरही न पडणारे राज ठाकरे आजकाल चांगलेच सक्रीय झाल्याचे दिसते. शिवाय त्यांच्या मेळाव्यांची संख्याही तुलनेने वाढली आहे. आगामी निवडणूकांमध्ये त्यांचे हे ईव्हीएमचे राजकारण त्यांनाच भोवू नये म्हणजे झाले. अलीकडेच महाविकास आघाडी, मनसे आणि सहयोगी पक्षांनी मिळून मतदार यादीतील घोळाच्या विरोधात सत्याचा मोर्चा काढला. ईव्हीएम आणि मतपत्रिकेच्या विरोधातील या आंदोलनात राज ठाकरे हे सर्वाधिक उत्साही आणि आक्रमक दिसतात. खरेतर, उद्धव ठाकरेंसोबतची यूती आणि महापालिका जिंकण्याच्या ईच्छेपोटी राज यांचा उत्साह द्विगुणीत झाला असावा. परंतू, सभांमध्ये मनसेला मिळणारा प्रतिसाद पाठींब्यात का परावर्तीत होत नाही? याचे आत्मचिंतन त्यांनी करणे गरजेचे आहे.

लोकसभेत संविधान बचाओच्या फ ेक नरेटिव्हमुळे मविआला यश आले. त्यानंतर मविआतील एकाही घटक पक्षाने निवडणूक प्रक्रियेवर आक्षेप घेतला नाही. पण विधानसभेत मात्र, त्यांचा हा नरेटिव्ह चालला नाही. त्यामुळेच आता कदाचित नवा फेक नरेटिव्ह सेट करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांना सामोरे जाण्याची ही धडपड सुरु आहे.

''मुळात अपयशाचे कारण देण्यासाठी सोपी कारणे बघण्याचा प्रयत्न मविआचे नेते करत आहेत. मविआ आणि मनसेतील जमिनीवर काम करणारे कार्यकर्ते आणि संघटनात्मक क्षमतेचा अभाव याचा हा परिणाम आहे. मनसेच्या सभांना प्रतिसाद मिळतो, परंतू, प्रत्यक्षात मतदानावेळी जनता विश्वास ठेवत नाही. त्यामुळे मनसे किंवा मविआच्या नेत्यांना विधानसभा निवडणूकीत जनतेने धडा शिकवला. गेलेली विश्वासार्हता कशी मिळवता येईल यासाठी त्यांनी प्रयत्न करावा. त्याकरिता लोकांमध्ये जाऊन विरोधकांनी काम करावे. पण त्याऐवजी अशी कारणे ते शोधत आहेत.

## राज्यातील ३१ विधानसभेत तब्बल २ लाख २५ हजार दुबार मुस्लिम मतदार, राज-उद्धव यांना केवळ हिंदू मतदार दिसतात का? आशिष शेलार यांचा सवाल

**मुंबई/प्रतिनिधी :** दुबार मतदार नोंदणीवरून राज, उद्धव ठाकरेंसह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रान पेटवलं असताना आता भाजपाने 'व्होट जिहाद'चा मुद्दा पुढे करत त्यांना प्रत्युत्तर देण्याची तयारी सुरू केली आहे. त्या अनुषंगाने मुंबई उपनगरचे पालकमंत्री आशिष शेलार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन काही धक्कादायक दावे केले. लोकसभा निवडणुकीत राज्यात जी मतदार यादी वापरण्यात आली, तिचा अभ्यास केल्यानंतर ३१ विधानसभा मतदारसंघांत तब्बल २ लाख २५ हजार ७१९ दुबार मुस्लिम मतदार आढळल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. हे दुबार मतदार लोकसभेत मविआच्या तुलनेत भाजपाला मि ळालेल्या मत फरकापेक्षा अधिक असून, संपूर्ण २८८ मतदारसंघांत असे १६ लाखांहून अधिक दुबार मतदार असल्याचा दावा शेलार यांनी केलाय. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना फक्त हिंदू-मराठी दुबार मतदार दिसतात, मुस्लिम दुबार मतदारांकडे डोळेझाक का? असा सवाल उपस्थित करीत शेलार यांनी हे प्रकरण निवडणूक आयोगाकडे देणार असून, राज्यभर पत्रकार परिषदा घेऊन विरोधकांना बेनकाब करणार असल्याचे सांगितले.



मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत आशिष शेलार यांनी लोकसभा निवडणुकीच्या आकडेवारीचा हवाला देत गंभीर आरोप केलेत. ते म्हणाले की, ''लोकसभेत मविआला २ कोटी ५० लाख १५ हजार ८१९ मतं मिळाली, तर महायुतीला २ कोटी ४८ लाख १२ हजार ६२७ मतं मिळाली. अंतर फक्त २ लाख ३ हजार १९२ मतांचं आहे. याच निवडणुकीतील मतदार याद्या तपासल्या असता केवळ ३१ विधानसभा मतदारसंघांत २ लाख २५ हजार ७१९ दुबार मुस्लिम मतदार आढळले. भाजपाला कमी पडलेली मतं याहून कमी आहेत. मग हा तुम चा घोटाळा नाही का? असा सवाल त्यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांना केला. संपूर्ण राज्यात १६ लाखांहून अधिक दुबार मतदार असतील,'' असेही ते म्हणाले.

## ॲडव्होकेट असीम सरोदेंची सनद रद्द , बार कौन्सिलचा मोठा निर्णय, नेमके काय घडले?

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यातील सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲडव्होकेट असीम सरोदे यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलने सोमवारी हा निर्णय घेतला. ॲडव्होकेट विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने हे निर्देश दिलेले आहेत. असीम सरोदे यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्यामुळे असीम सरोदे यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. असीम सरोदे हे सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबत सुरु असलेल्या सुनावणीत सहभागी असणाऱ्या वकिलांपैकी एक आहेत. मात्र, आता त्यांची सनद रद्द झाल्याने त्यांना न्यायालयात युक्तिवाद करता येणार नाही. याबाबत ॲडव्होकेट असीम सरोदे यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.


माजी ॲडव्होकेट असीम सरोदेंनी एका सार्वजनिक कार्यक्रमात न्यायव्यवस्था, राज्यपाल आणि विधानसभा अध्यक्ष यांच्या संदर्भात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. त्यांच्या वक्तव्यांमुळे न्यायव्यवस्थेचा अपम ान झाला आणि न्यायालयांविषयी अविश्वास निर्माण झाल्याची तक्रार एका तक्रारदाराने केली होती. असीम सरोदेंचे वक्तव्य अशोभनीय, गैरजबाबदार व बदनामीकारक असल्याचे नमूद करून बार कौन्सिलकडे याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारदाराने १९ मार्च २०२४ रोजी सरोदेंना लेखी माफी मागण्याची संधी दिली, पण त्यांनी ती नाकारली. त्यामुळे आता त्यांची वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्यात आली आहे.

ॲडव्होकेट विवेकानंद घाटगे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने असीम सरोदे यांच्या भाषणाचे ट्रान्सक्रिप्ट आणि व्हिडिओ क्लिप पाहिल्या. व्हिडिओमध्ये असीम सरोदे स्पष्टपणे म्हणताना दिसत आहेत की, ''राज्यपाल फालतू आहेत'' व ''न्यायालय सरकारच्या दबावाखाली आहे''. अशा विधानांमुळे नागरिकांमध्ये न्यायालयाबद्दल अविश्वास निर्माण होतो. न्यायव्यवस्था आणि संविधानिक पदे यांचा आदर राखणे ही वकिलाची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. वकील हा ''ध्षग्मी दष ूप ण्दली'' असल्याने त्याने न्यायसंस्थेविषयी संयम आणि सन्मान राखला पाहिजे, असे बार कौन्सिलच्या समितीने म्हटले.

## गौरविलेल्या सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्यांची उभारणी– मंत्री आदिती तटकरे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अंगणवाड्यांना आधुनिक, सशक्त आणि पारदर्शक बनवून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी स्मार्ट अंगणवाडी योजनेअंतर्गत राज्यभरात व्यापक कार्यवाही सुरू आहे. या योजनेअंतर्गत उत्कृष्ट सरपंच म्हणून गौरविण्यात आलेल्या १३ सरपंचांच्या गावांमध्ये स्मार्ट अंगणवाड्या उभारण्यात आल्या असल्याचे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.



महिला बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, १३ गावांतील अंगणवाड्यांना स्मार्ट स्वरूप देण्यात आले आहे. या केंद्रांमध्ये अत्याधुनिक सुविधा, डिजीटल शिक्षण साधने, तसेच बालक आणि मातांसाठी आरोग्य व पोषण जनजागृती उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. हे काम पूर्ण झाल्याचा मनस्वी आनंद आहे. एकात्मिक बालविकास सेवा (आयसीडीएस) योजनेअंतर्गत अंगणवाड्यांमध्ये बालकांना आरोग्य, पोषण आणि पूर्व-प्राथमिक शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत मूलभूत सेवा पुरविल्या जातात. या अंगणवाड्यांना स्मार्ट बनविण्याच्या उपक्रमामुळे त्यांच्या पायाभूत सोयी-सुविधांमध्ये सुधारणा झाली असून, शिक्षण आणि पोषण सेवा अधिक प्रभावी पद्धतीने दिल्या जात आहेत.

मंत्री तटकरे यांनी म्हणाल्या की, स्मार्ट अंगणवाडी हे केवळ इमारतीचे नव्हे, तर बालक आणि मातांच्या उज्ज्वल भविष्याचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि संवेदनशील दृष्टिकोन यांचा संगम घडवून अंगणवाड्यांना आदर्श केंद्र बनवण्याचा प्रयत्न आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील सर्व अंगणवाड्यांना टप्प्याटप्प्याने स्मार्ट स्वरूप देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू असल्याचेही तटकरे यांनी सांगितले.

## तृतीयपंथी समाज पुन्हा एकदा राजकारणात नवा अध्याय लिहिणार!

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांमध्ये तृतीयपंथी घटकांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे, अशी ठाम मागणी मैत्री संघटना, सर्व तृतीयपंथी समुदाय कोल्हापूर यांच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आली.

मैत्री संघटनेच्या अध्यक्षा मयुरी आळवेकर, शिवानी गजबर, अमृत आळवेकर, तसेच तृतीयपंथी समाजाचे ज्येष्ठ गुरू शिवाजीराव आळवेकर यांनी यावेळी सांगितले की, राजकीय पक्षांनी तृतीयपंथी समाजातील उमेदवारांना प्राधान्य देऊन उमेदवारी द्यावी, अन्यथा तृतीयपंथी समाज स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्यास सक्षम आहे. या समाजामध्ये केवळ प्रतिनिधित्वाची पात्रता नाही, तर जनतेशी जोडून राहण्याची व त्यांच्या प्रश्नांवर उपाय शोधण्याची खरी राजकीय क्षमता आहे, हे या प्रसंगी स्पष्ट करण्यात आले.

तृतीयपंथी समुदायाने या वर्षीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रत्यक्ष सहभाग घेऊन निवडून येण्याचा निर्धार व्यक्त केला. ''महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा राज्य असून शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा लाभलेला कोल्हापूर जिल्हा हा नेहमीच वंचित घटकांच्या पाठीशी उभा राहिला आहे. त्यामुळे या समाजालाही समान प्रतिनिधित्व देऊन, राजकीय प्रक्रियेत सामील करून घेणे ही काळाची गरज आहे,'' असे संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले.

## एकल महिलांना विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी विशेष अभियान राबवा : उपमुख्यमंत्री अजित पवार

### एकल महिलांना पुनर्विवाहासाठी आर्थिक मदत व पात्र एकल महिला लाभार्थींनाही घरकुल योजनेचा लाभ देण्याचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : एकल महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजनांचे लाभ मिळवून देण्याची गरज आहे. त्यासाठी राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटनिहाय विशेष अभियान राबवावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.**



उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी पुणे जिल्हा परिषदेने सुरू केलेल्या मोहिमेच्या धर्तीवर राज्यस्तरावर अभियान राबविण्याबाबत बैठक झाली.

यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव तथा पुणे जिल्ह्याच्या पालक सचिव व्ही.राधा, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, वित्त विभागाच्या सचिव शैला ए., ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, एकल महिलांना समाजात सन्मानाची वागणूक देणे, मालमत्तेचे हक्क देणे, आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, त्यांना आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या सक्षम करून स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करावे. केरळ आणि तामिळनाडू या राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात एकल महिलांना पुनर्विवाहासाठी आर्थिक मदत करावी. पात्र एकल महिला लाभार्थींना सुद्धा घरकुल योजनेचा लाभ द्यावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण करून राज्यस्तरीय संगणकीय डेटाबेस प्रणाली तयार करणे, अंगणवाडी सेविका निवड प्रक्रियेप्रमाणे शासन निर्णयात बदल करून एएनएम, स्टाफ नर्स निवड आणि एनएचएम भरती प्रक्रियेत एकल महिलांना प्राधान्य देणे, त्यांना शासकीय कागदपत्रे उपलब्ध करून देणे, व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देणे, एकल महिलांसाठी गाव पातळीवर जागरूकता शिबिरे आणि मार्गदर्शन सत्र आयोजित करणे,अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

>> पान २

## महिला क्रिकेट संघाची ऐतिहासिक कामगिरी !

२ नोव्हेंबर २०२५ हा दिवस भारतीय महिला क्रिकेट इतिहासात सुवर्णाक्षराने नोंदवला जाणार आहे कारण यादिवशी भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेवर ५२ धावांनी विजय मिळवत विश्व विजयाला गवसणी घालत ऐतिहासिक कामगिरी केली. या क्षणाची प्रतीक्षा १४५ कोटी भारतीय गेली अनेक दशके करत होता. रविवारी नवीमुंबईच्या डी वाय पाटील स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेल्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने विजय मिळवून देशवासीयांना दिवाळीची अनोखी भेट देतील याची चाहूल शुक्रवारी झालेल्या उपांत्य फेरीतील सामन्यातच लागली होती. ऑस्ट्रेलिया विरुद्ध झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात जेमिना रॉड्रिग्स हिने अविश्वसनीय खेळ करून भारताला अंतिम फेरीत पोहचवले. अंतिम फेरीत भारताचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होता. भारतीय संघाने जर आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारतीय संघ विश्चषकावर नाव कोरेल असा विश्वास देशवासीयांना होताच मात्र दक्षिण आफ्रिकेला कमी लेखण्याची चूक भारतीय संघ करणार नव्हता कारण साखळीत या संघाने भारताला नमवले होते. दक्षिण आफ्रिकेने नाणेफ ेक जिंकत भारताला प्रथम फलंदाजी दिली. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी शतकी सलामी देऊन भारताला चांगली सुरुवात करून दिली. भारताची सलामीवीर शेफाली वर्माने धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या ७८ चेंडूत ८७ धावा केल्या विशेष म्हणजे ती भारताच्या मुख्य संघात नव्हती मात्र प्रतिका रावल ही दुखापतग्रस्त झाल्याने तिची भारतीय संघात निवड झाली आणि तिने मिळालेल्या संधीचे सोने केले. धडाकेबाज फलंदाजीसोबतच तिने दोन बळी घेऊन अष्टपैलू कामगिरी केली आणि सामनावीर किताब मिळवला. दीप्ती शर्मा या आणखी एका अष्टपैलू खेळाडूने अर्धशतक झळकावले आणि गोलंदाजीत ५ बळी मिळवले. स्पर्धेत २०० च्या वर धावा आणि सर्वाधिक २२ बळी या तिच्या अष्टपैलू कामगिरीची दखल घेऊन तिला मालिकावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. शेफाली आणि दीप्तीला स्मृती मानधना, हरमनप्रित कौर, जेमिना रॉड्रिग्ज, रिचा घोष यांची चांगली साथ दिल्याने भारताने २९८ धावा काढल्या. अंतिम सामन्यात या धावा पुरेशा ठरल्या. भारताच्या सर्वच गोलंदाजांनी चांगली गोलंदाजी केल्याने भारताने दक्षिण आफ्रिकेला ५२ धावांनी सहज नमवता आले. दक्षिण आफ्रिकेची कर्णधार लॉरा हिने झुंझार शतक झळकावत संघाला विजय मिळवून देण्याचा प्रयत्न केला पण तिचे प्रयत्न अपुरे ठरले आणि भारताने ऐतिहासिक विजय मिळवत पहिल्यांदाच विश्वचषकावर नाव कोरले. भारतीय महिलांची ही कामगिरी महिला क्रिकेट संघासाठी संजीवनी देणारी ठरणार आहे कारण आपल्या देशात महिला क्रिकेटला कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही. हा विश्वचषक असल्याने याचे थेट प्रेक्षपण केले गेले मात्र द्विपक्षीय मालिका टीव्हीवर दाखवल्या जात नाहीत. महिला क्रिकेट संघाला प्रायोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात हेच या विश्व विजयाने दाखवून दिले आहे. याआधी भारताच्या १९ वर्षाखालील मुलींनी दोनदा विश्वचषक जिंकला आहे मात्र वरिष्ट संघाला विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश येत होते. दोनदा भारतीय संघ विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचला होता मात्र त्या संघांना विश्व विजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते त्यामुळे भारताच्या वरिष्ट संघाला विजेतेपद मिळवणे शक्य नाही अशी टीका होत होती. साखळी फेरीतही भारतीय महिला संघाने सलग तीन सामने गमावल्या नंतर या संघावर टीका होऊ लागली मात्र भारताच्या महिला खेळाडूंनी या टीकेकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून अशक्य वाटणारी कामगिरी शक्य करून सर्वांनाच चकित केले. भारतीय महिला संघाने फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाडीवर अप्रतिम कामगिरी केली. कर्णधार हरमनप्रीत कौर यांनी या संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. या संघाचे प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांनी संघाला विश्व विजयी करण्यात मोलाची कामगिरी बजावली. एकूणच सांघिक कामगिरी करून भारताने हा विश्वविजय मिळवला आहे. भारताच्या महिला संघाची ही कामगिरी ऐतिहासिकच आहे. भारताच्या या महिला खेळाडूंच्या कामगिरीचा देशातील १४५ कोटी जनतेला सार्थ अभिमान आहे. महिला क्रिकेटसाठी हा क्षण सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. महिला क्रिकेटला उर्जितावस्था देणारा हा विजय आहे. पुरुष क्रिकेटमध्ये जे कपिल देवच्या संघाने १९८३ साली केले होते तेच हरमनप्रित कौरच्या या संघाने करून दाखवले आहे. पहिल्यांदाच विश्वचषक जिंकून भारताच्या या महिलांनी इतिहास घडवला आहे. भारताच्या या महिला खेळाडूंनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला आहे. वास्तविक भारताच्या महिला संघाने यापूर्वी देखील देशासाठी अनेकदा अप्रतिम कामगिरी केली आहे असे असूनही भारतीय महिला क्रिकेटला देशात गांभीर्याने घेतले जात नाही. जितकी लोकप्रियता पुरुषांच्या क्रिकेटला मिळते तितकी महिला क्रिकेटला मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. या विश्व विजेतेपदानंतर तरी देशात महिला क्रिकेटला गांभीर्याने घेतले जाईल अशी आशा करूया. पहिल्यांदाच विश्वचषकावर भारताचे नाव कोरून इतिहास घडवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचे मनापासून अभिनंदन! चक दे इंडिया!! जय हो!!!

# श्री निळकंठेश्वर मंदिराच्या जतन, संवर्धनाला सर्वोतोपरी सहाय्य - सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार

## मंदिर व परिसरातील बारवांना राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेणार

**दैनिक आपला विदर्भ**





**लातूर/प्रतिनिधी :** निलंगा येथील श्री निळकंठेश्वर मंदिराचे ऐतिहासिक, पुरातन स्वरूपात जतन व संवर्धन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. या कामाला भरीव निधी उपलब्ध करून देण्यासह मंदिर व परिसरातील बारवांना राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. श्री नीलकंठेश्वर मंदिर व परिसराच्या पाहणीनंतर ते बोलत होते.

यावेळी त्यांनी श्री निळकंठेश्वर महाआरतीस उपस्थिती लावली. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, तांत्रिक सल्लागार तेजस्विनी आफळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, अरविंद पाटील निलंगेकर, अजित पाटील कव्हेकर, लिंबन महाराज रेशमे यांच्यासह श्री निळकंठेश्वर मंदिर विश्वस्त, पदाधिकारी, नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपला महाराष्ट्र सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आहे. आपल्या संस्कृतीचे जतन करत राज्याचा विकास करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राज्यातील सर्वच पुरातन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्यात येणार असून यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. श्री नीलकंठेश्वर मंदिरासह बारवांच्या संवर्धनासाठी आवश्यक निधी देण्यात येईल. या मंदिराचा व परिसराचा सांस्कृतिक, पुरातन ठेवा जपण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील. या परिसराला राज्य संरक्षित वास्तू घोषित करण्याचा निर्णय घेण्यात येईल, असे ॲड. शेलार यांनी सांगितले.

आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी श्री निळकंठेश्वर मंदिराच्या ऐतिहासिक व पुरातन वारसा यावेळी सांगितला. तसेच या मंदिराच्या जतन व संवर्धनाच्या कामांना भरीव निधी देण्याची विनंती त्यांनी यावेळी केली.

तांत्रिक सल्लागार तेजस्विनी आफळे यांनी मंदिराच्या जतन व संवर्धनासाठी आवश्यक कामांची माहिती दिली. प्रा . दत्ता शाहीर यांनीही यावेळी मंदिराविषयी माहिती देत मंदिराच्या जतन, संवर्धनाची गरज विषद केली. सूत्रसंचालन शैलेश गोजमगुंडे यांनी केले. माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जय हिंद ! जय भारताच्या मुलींनो!, भारताच्या वाघिणींचे सुवर्णपान

## एका आकांक्षेपासून विश्वविजयापर्यंत! – तुम्ही मैदानावर इतिहास नाही भवीष्य लीहले



मैदानावरच्या त्या क्षणी वेळ थबकली होती. आपल्या धडधडत्या हृदयाचे ठोकेही जणू श्वास रोखून पाहत होते हरमनप्रीत कौरने जेव्हा तो अंतिम झेल हातात घट्ट पकडला! एक आवाज उमटला पहिले सौम्य मग गर्जना आणि मग ''भारत विश्वविजेता!'' होय भारताची मुलगी, भारताची विजेती झाली होती! नवी मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा ५२ धावांनी पराभव करून प्रथमच वर्ल्ड कपला गवसणी घातली आणि इतिहासाचे पान सुवर्ण अक्षरांनी चमकू लागले. भारतीय महिला संघाने इतिहास रचला, जो केवळ क्रीडा नव्हे, तर शक्ती, सामर्थ्य आणि स्त्रीत्वाला नवा अर्थ देणारा बदल होता.

हा विजय केवळ २०२५ चा नव्हता, तर २०१७ च्या जखमेवर लावलेला मायेचा मलम होता. एकदा जवळ येऊन निसटलेला तो विश्वचषक, मनातून खोलवर पुरलेला दुखरा काटा होता. त्याच स्मृतींनी आज विजयाचा दिवा पेटवला आणि ''अद्याप अपूर्ण आहे कथा'' असा धगधगता शपथेचा ज्वालामुखी शांत झाला.



हरमनच्या पकडो कॅच जितो मॅचने केवळ सामना नव्हे, तर भारताच्या नियतीची पकड मजबूत केली. हा विजय गाव–गल्लीपासून वर्ल्ड स्टेडियमपर्यंतचा प्रवास होता, जिथे खेळातली चूक कधी रडवून गेली, तर समाजाचा उपहास कधी जखमा देऊन गेला; पण त्या जखमेचा मलम जिद्द नावाचा होता!

केवळ प्रयत्नच नाही तर नियतीसुद्धा या भारतीय वाघिणींच्या बाजूने होती. कर्णधार हरमनने मिड ऑनला आणि स्मृतीने मिड ऑफला उभे राहून मध्यमगती गोलंदाज रेणुका ठाकूरला चिअर अप करत राहणे, अमनज्योतला एकाच झेलासाठी तीन संधी मिळणे, आणि शेवटी हरमनच्या हाती अखेरचा झेल स्थिरावणे, ही प्रयत्नांना नियतीची मिळालेली जोड होती.

हा विश्वविजय केवळ एक ट्रॉफी नव्हती, तर मुलींमध्ये वाढणाऱ्या खेळाची आवड आणि राष्ट्राच्या कीडा क्षेत्राची ती पावती होती. आज पहिल्यांदाच स्टेडियमची सीट्स नव्हे समाजाची मानसिकता भरून वाहत होती! हा प्रवास 'भारताची मुलगी' ते 'भारताची विजेती' शक्ती, सामर्थ्य, स्त्रीत्वाचा आहे. भारतीय वाघिणींच्या प्रत्येक धावेमध्ये त्यांच्या संघर्षाचे अक्षर होते, प्रत्येक विकेटमध्ये त्यांच्या अपमानाचा प्रतिउत्तर होता. त्यांनी दाखवून दिले की ''विजयाला लिंग नसते!''



२१ वर्षीय शेफाली वर्मा ही या विजयाची नायिका ठरली. संघाबाहेरून रिप्लेसमेंट म्हणून आलेली आणि अंतिम सामन्यात ८७ धावा आणि २ महत्त्वाच्या विकेट्स घेऊन सामनावीर पुरस्कार जिंकणारी ती पुरुषांच्या आणि महिलांच्या क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरली. तिने केवळ चेंडू मारला नाही, तर समाजाच्या पुराणमतवादी दृष्टीला सीमारेषेबाहेर फेकले! दीप्ती शर्मा मालिकेत आणि अंतिम सामन्यात (५/३९) तिची अष्टपैलू कामगिरी, तसेच तिचा अखेरचा बळी नियती सुसंगत होता.



हा विजय व्यापक स्त्री–सक्षमीकरणाचे प्रतिक आहे. आज प्रत्येक आई म्हणाली ''ही माझी मुलगी आहे!'' आणि प्रत्येक बाबांचे डोळे म्हणाले ''मी तिसऱ्यांदा जन्म घेतला पहिल्यांदा तिला जन्म देताना, दुसऱ्यांदा ती खेळताना, आणि आज ती जिंकताना!'' हे यश दाखवून देते की, ''पोरी खेळतात'' ते आता ''पोरी जिंकतात'' यात बदलले आहे.

विजयातही प्रतिस्पर्ध्यांना मिठी देणारी हीच तर भारतीय संस्कृतीची सौम्यता! मॅरिझान कॅप पराभवानंतर रडत असताना, भारतीय खेळाडू जेमिमा रॉड्रिग्ज आणि राधा यादव यांनी तिला मिठी मारून धीर दिला. पराभवातही सन्मान दाखवणारी ही खिलाडूवृत्ती जगाला भावली, जी ट्रॉफी जिंकण्याहून अधिक महान आहे.

संघाच्या यशामागे कर्णधार हरमनप्रीत कौर आणि मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार यांचे शांत, पण धगधगते नेतृत्व होते. हरमन डोळ्यात पाणी असूनही चेहऱ्यावर शांतता ठेवणारी हरमन, टीम इंडियाला शांतपणे फिनिशिंग लाईनपर्यंत घेऊन गेली. तिच्या नेतृत्वातील आग, आस्था आणि ''कप हाती नव्हे, मनात घेऊन खेळणे'' या तत्त्वाने इतिहास घडवला.

ज्या अमोल मुजुमदारला खेळाडू म्हणून कधीही आंतरराष्ट्रीय सामना खेळायला मिळाला नाही, त्याने आज 'आंतरराष्ट्रीय विजेता संघाचा सूत्रधार' म्हणून इतिहास रचला. विजयानंतर हरमनने जेव्हा भरल्या डोळ्यांनी अमोल मुजुमदारच्या पाया पडली, ती हजार वेळा प्रेम करावे अशी फ्रेम होती! त्याचा शांत नेतृत्व, मानसिक मजबुती आणि अचूक रणनीती हेच या यशाचे गमक आहे. ''छायेतील सूर्य'' असलेल्या या प्रशिक्षकाने, कधी न खेळलेल्या खेळाडूने विजेते घडवले.

या ऐतिहासिक विजयामुळे भारतीय महिला क्रिकेटला आर्थिक समानता आणि सन्मानाचा नवा अध्याय मिळाला आहे. टीम इंडियाने विश्वचषक जिंकून क्ष्क् कडून ॐ४.४८ दशलक्ष (सुमारे ४० कोटी रुपये) इतकी विक्रमी बक्षीस रक्कम जिंकली आहे. पुरुष किंवा महिला क्रिकेटच्या इतिहासातील ही सर्वात मोठी बक्षीस रक्कम आहे, जी समानतेच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. तसेच, एक्क्क्ष् ने पुरुषांच्या टी–२० विश्वचषक विजेत्या संघाला दिलेल्या १२५ कोटी रुपयांइतकीच बक्षीस रक्कम महिला संघासाठी जाहीर केली आहे, ज्यामुळे महिला क्रिकेटला अभूतपूर्व पाठिंबा मिळाला आहे.

यानिमीत्ताने असे म्हणावे लागेल महिला प्रीमियर लीग (ज़्घ्र्) सारख्या स्पर्धांमुळेच खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या दबावात खेळण्याचा अनुभव मिळाला, ज्यामुळे त्यांना विश्वचषकासारख्या मोठ्या स्तरावर कामगिरी करणे शक्य झाले.

या विजयामुळे ''विश्वकप'' नव्हे, तर ''महीला विश्व कप'' या शब्दाला जगात नवी ओळख मिळाली आहे. हा विजय हे भारतीय महिला क्रिकेटमधील नव्या युगाची सुरुवात आहे. देशभरातील प्रेक्षकांचे धडधडणारे हृदय, हजारो मोबाईल–टीव्हीसमोर गोठलेली नजर, आणि शेवटी गर्जनाऱ्या आवाजात एकच घोषणा जय हिंद ! जय भारताच्या मुलींनो!

हा विजय भारतीय महिला क्रिकेटचा नाही, तो प्रत्येक भारतीयाच्या आत्मविश्वासाचा, प्रत्येक मुलीच्या स्वप्नांचा आणि एका नव्या भारताच्या भविष्याचा पाया आहे. या विजयाच्या ट्रॉफीला धूळ बसू शकेल, पण या दिवसाच्या अभिमानाला कधीच नाही! या मुलींनी दाखवून गेल्या ''उड्डाणाला पंखांपेक्षा उत्साहाची गरज असते.'' त्यांनी इतिहास नाही, भविष्य लिहिले आहे!

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**– मो. ९८९०५७७१२८**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

**हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित**

## आरोग्य विशेष...

### मोबाईल स्क्रीनवर जाहिरातींचा महापूर, या छोट्या सेटिंगमुळे सोपे होईल काम

फोन वापरताना काही समस्या उद्भवतात, ज्यामुळे फोन वापरण्याचा अनुभव खराब होतो. या समस्यांमध्ये नेटवर्क समस्या आणि जाहिरातींचा वारंवार घटना समाविष्ट आहे. कामाच्या मध्येच जाहिरात आल्याने अनेक वेळा चिडचिड होते, अशा स्थितीत अनेकांना त्रास होऊन चिडचिड होते. पण तुमच्यासोबत असे होऊ नये म्हणून आम्ही तुम्हाला या समस्येपासून मुक्त कसे होऊ शकता ते सांगणार आहोत.

अशा प्रकारे जाहिराती होतील ब्लॉक

यासाठी सर्वात आधी तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा, त्यानंतर सर्च बारमध्ये 'झीर्ळींश उक्षड' लिहून सर्च करा. यानंतर प्रायव्हेट डीएनएसवर क्लिक करा आणि प्रायव्हेट डीएनएस प्रोव्हायडर होस्टनेमच्या पर्यायावर क्लिक करा.

याच्या खाली तुम्हाला एक रिकामी जागा मिळेल ज्यामध्ये तुम्हाला ीर्ळींशवपीरवर्सीरीव.लो लिहायचे आहे. यानंतर ही कमांड सेव्ह करा. हे केल्यानंतर तुम्हाला जाहिराती दिसणे बंद होईल.

तुमच्या फोनमध्ये कमी थर्ड पार्टी ॲप्स वापरण्याचा कमी प्रयत्न करा. बऱ्याच वेळा, थर्ड-पार्टी ॲप्समुळे, अधिक जाहिराती येतात.

हा उपाय जाहिरातीपासून मुक्त होण्यास करेल मदत

जर वर नमूद केलेल्या पद्धतीमुळे जाहिरातींचा हल्ला थांबत नसेल, तर तुम्ही तुमच्या फोनमध्येही ही सेटिंग करू शकता. यासाठी सर्वप्रथम तुमच्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन गुगलवर क्लिक करा. यानंतर 'मॅनेज युअर गुगल अकाउंट' या ऑप्शनवर क्लिक करा.

येथे 'डेटा आणि गोपनीयता' या पर्यायावर क्लिक करा. यानंतर 'पर्सनलाइज्ड अ्स' वर जा. तुमच्या कोणत्या क्रियाकलापांचा मागोवा घेतला जात आहे, ते येथे तुम्ही पाहू शकता. ज्यामुळे तुम्हाला जाहिराती दाखवल्या जातात. गुगल तुम्हाला तुमच्या आवडीनुसार आणि शोधानुसार जाहिराती दाखवते.

'पर्सनलाइज्ड ॲ्स' नंतर 'माय सेंटर' या पर्यायावर क्लिक करा. येथे 'Personalized Ads' चा पर्याय दिसेल, तो बंद करा. हे केल्यानंतर, फोनच्या सेटिंग्जमध्ये पुन्हा जा आणि उद्दुत वर क्लिक करा आणि 'अर्वीर्शीीळीळपस खऊ हटवा' वर क्लिक करून तो हटवा. या सेटिंग्ज केल्यानंतर, तुम्हाला फोनवर जाहिराती दिसणे बंद होईल. तुम्ही आनंदाने आणि कोणत्याही व्यत्ययाशिवाय काहीही करण्यास सक्षम व्हाल.

### वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे कराल या टिप्स फॉलो करा अन् तुमच्या मुलांची उन्हाळा सुट्टी आनंददायी बनवा

उन्हाळ्यात शरीरातील पाणी कमी झाल्यामुळे उष्म घाताची सर्वाधिक जोखीम अधिक असते. अतिसार, लघवीला जळजळ होणं, उलटी तसेच डोकेदुखीसारखे त्रास होतात. लहान मुलं शारीरिकदृष्ट्या खूप नाजूक असतात. त्यामुळे उन्हाळ्यातील कडक ऊन आणि प्राणघातक उष्णतेचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर तसेच त्यांच्या नाजूक त्वचेवर होतो. वातावरणातील बदल व हवेतील आर्द्रता यामुळे मुलांमध्ये विषाणूंचे संक्रमण होऊन खोकला व सर्दीसारखे विकार होत असतात. मुलांची त्वचा नाजूक असते. तेव्हा त्यावर प्रखर सूर्यकिरणांचा परिणाम होऊन त्वचा पोळली जाते व काळी पडण्याची शक्यता असते.

उघड्या अन्नावरील विषाणू व विषाणूयुक्त पाणी यातून आजार जडतो. तसेच दूषित बर्फामधून याचा फैलाव होत असतो. मुलांच्या बाबतीत पालकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. उलट्या किंवा तापाची लक्षणे दिसताच तत्काळ डॉक्टरांना दाखवणे गरजेचे आहे. मुलांची विशेष काळजी घेण्यासाठी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊया. म दरहूड हॉस्पिटल येथील सल्लागार बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत मोरलवार यांनी वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे करायचे याबद्दल माहिती दिली आहे.

वाढत्या उष्णतेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे कराल

- मुलांना दिवसभर पाणी पिण्यास प्रोत्साहन द्या जेणेकरुन ते हायड्रेटेड राहतील विशेषत: मैदानी खेळादरम्यान त्यांना पुरेसे पाणी द्या. दररोज किमान १०-१२ ग्लास पाणी प्या.
- घराबाहेर पडताना भरपूर पाणी प्या आणि साखरयुक्त पेयांचे सेवन टाळा ज्यामुळे जलद निर्जलीकरण होते.
- थकवा, डोकेदुखी, स्नायूंमधील वेदना आणि चक्कर येणे यासारख्या निर्जलीकरणाच्या लक्षणांकडे लक्ष द्या.
- अत्यावश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे प्रदान करण्यासाठी फळे, भाज्या आणि तृणधान्यांनी समृद्ध आहाराचे सेवन करा.
- शर्करायुक्त पदार्थ आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थांचे सेवन मर्यादित करा. यातुन कमी पौषणमूल्य आणि ऊर्जा पातळीवर परिणाम होऊ शकतात.
- फळे, सुकामेवा किंवा दही यांसारखे निरोगी पदार्थांचे सेवन करा.

उष्णतेपासून बचाव कसा कराल

- घराबाहेर जाण्यापूर्वी कमीतकमी १५ मिनिटे आधी तुमच्या मुलांच्या उघड्या त्वचेवर एइइ ३० किंवा त्याहून अधिक सनस्क्रीन लावा.
- दर दोन तासांनी किंवा जास्त वेळा पोहल्यानंतर किंवा घाम आल्यावर पुन्हा सनस्क्रीन लावा.
- टोपी, सनग्लासेस आणि सैलसर सुती कपडे यासारखे कपडे घाला.

पाण्यात खेळताना घ्यायची सुरक्षा -

- आपल्या मुलाला पाण्याच्या जवळ कधीही लक्ष न देता सोडू नका, अगदी काही क्षणासाठी देखील.
- तुमच्या मुल पोहताना त्याच्यास आजूबाजूस एखादी प्रौढ व्यक्ती असेल याची काळजी घ्या.
- मुलांना पाण्याची सुरक्षेची मूलभूत कौशल्ये शिकवा जसे की तरंगणे आणि पोहण्याचे तंत्र शिकवा.

या उन्हाळ्यात सुरक्षा टिप्सचे पालन करून, तुम्ही तुमच्या मुलासाठी उन्हाळा आनंददायी बनवू शकता.

# शेतकऱ्यांना दिलासा देणारी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना'

जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यमान यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना सातत्याने करावा लागत आहे. अशावेळी शेतकरीवर्गाला मदतीचा हात देऊन त्यांना दिलासा देण्यासाठी राज्यातील ७.५ एचपीपर्यंतच्या शेती पंप ग्राहकांना मोफत वीज देण्यासाठी 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४' राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यात मार्च २०२४ अखेर ४७ लाख ४१ हजार इतके कृषी पंप ग्राहक असून या ग्राहकांना महावितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करण्यात येतो. एकूण ग्राहकांपैकी १६ टक्के कृषीपंप ग्राहक असून ऊर्जे च्या एकूण वापरापैकी सुमारे ३० टक्के ऊर्जेचा वापर कृषी क्षेत्रासाठी होतो. कृषी ग्राहकांचा सध्याचा एकूण वार्षिक वीज वापर ३९ हजार २४६ दश लक्ष युनिट आहेत. प्रामुख्याने या विजेचा वापर कृषी पंपास वीज पुरवठा करण्यासाठी होतो. सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या काळात १०/८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते.

जून २०२४ महिन्यात झालेल्या पावसाळी अधिवेशनात उपमुख्यमंत्री




तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४' राबविण्याची घोषणा केली होती. या योजनेद्वारे शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरविले असून राज्यातील ४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरविण्यात येणार आहे. याकरीता १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना मदत करण्याच्यादृष्टीने व त्यांची थकबाकी वाढू न देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना-२०२४ राबविण्यात येत आहे.

ही योजना ५ वर्षासाठी राबविण्यात येत असून त्याचा कालावधी एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत आहे. मात्र ३ वर्षाच्या कालावधीनंतर सदर योजनेचा आढावा घेवूनच पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. राज्यातील ७.५ एचपीपर्यंत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

**योजनेच्या अंमलबजावणीची पद्धत:**

'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' ही योजना महावितरण कंपनीतर्फे राबविण्यात येते. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देवून त्यानुसार अनुदानीत वीज दर लागू करण्याचे अधिकार आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर सदर वीजदर सवलतीपोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येत आहे.

सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत ६ हजार ९८५ कोटी रुपये अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये ७ हजार ७७५ कोटी रुपये असे वार्षिक वीजदर सवलतीसाठी प्रतिवर्षी १४ हजार ७६० कोटी रुपये शासनाकडून महावितरण कंपनीला अदा करण्यात येणार आहे. मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याचे धोरण शासनाकडून ठरविण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वीजेची सुलभतेने उपलब्धता होऊ शकेल.

सुनील काकडे, मुख्य अभियंता, महावितरण पुणे परिमंडल, पुणे :

'राज्य शासनाने जाहीर केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना २०२४ नुसार ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपाना मोफत वीजपुरवठा करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यात एकूण ३ लाख २९ हजार ४८८ शेतीपंप आहेत. त्यापैकी ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या एकूण २ लाख ८४ हजार १९८ शेतीपंपधारक शेतकऱ्यांना या मोफत वीज योजनेचा लाभ होत आहे.'


विकास किसन कापडी, मु. जारकरवाडी, पो. पारगांव, ता. आंबेगाव: आमचे ३ एचपी व ५ एचपीचे दोन शेतीपंप कनेक्शन आहेत. गेल्या दीडएक वर्षांपासून आमची लाईट बिलाची चिंता मिटली आहे. पूर्वी दर तीन महिन्याला बील यायचे. ते भरण्यासाठी पैशाची जुळवणी करताना दमछाक व्हायची. योजनेबद्दल सरकारचे धन्यवाद. तसेच सरकारने ही योजना कायमस्वरुपी सुरु ठेवावी.

सुनिल अर्जुन करंडे, काठापूर बु., ता. आंबेगाव:

माझे ५ एचपीचे कनेक्शन आहे. मागील वर्षांपासून आम्हाला शेतीचे बील येणे सरकारच्या बळीराजा मोफत योजनेमुळे बंद झाले आहे. या योजनेबद्दल मी समाधानी असून, सरकारचा आभारी आहे. दिवसा वीज देण्यासाठीही सरकारचे प्रयत्न सुरु आहेत.

**संकलन: जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# चमकदार त्वचा मिळविण्यासाठी हळदीचा अशा प्रकारे वापर करा



त्वचा सतत चमकदार असावी असे कोणाला वाटत नाही. सुंदर आणि चमकदार त्वचा मिळविण्यासाठी लोक अनेक पद्धतींचा अवलंब करतात. अनेकजण पार्लरमध्ये जाऊन हजारो रुपये खर्च करतात, तर पैसे आणि वेळेअभावी अनेकांना पार्लरमध्ये जाता येत नाही.

पार्लरमध्ये उपलब्ध असलेल्या स्किन केअर ट्रीटमेंटचा प्रभाव काही दिवस टिकतो, पण जर तुम्हाला कायमस्वरूपी चमकणारी त्वचा हवी असेल, तर त्यासाठी काही घरगुती उपायांमध्ये हळदीचा वापर करावा. हळदीचा नियमित वापर केल्यास चेहऱ्यावरील अनेक समस्या दूर होतात. त्वचेची काळजी घेण्यासाठी हळदीचा वापर वर्षानुवर्षे होत आहे. हळदीमध्ये असे घटक आढळतात, जे त्वचेसाठी खूप फायदेशीर असतात.

हळद आणि चंदन-

जर तुमच्या चेहऱ्यावर मुरुमांची खूप समस्या असेल तर तुम्ही हळदीमध्ये गुलाबपाणी, चंदन पावडर आणि मध मिसळून फेस पॅक बनवू शकता. चेहऱ्याची चमक कायम ठेवण्यासाठी हे खूप फायदेशीर आहे.

हळद आणि दही-

त्वचा उजळण्यासाठी ताजे दही आणि बेसनामध्ये हळद मिसळून फेस पॅक बनवा. हा पॅक चेहऱ्यावर लावा आणि कोरडे होईपर्यंत राहू द्या. पॅक सुकल्यावर कोमट पाण्याने चेहरा धुवा. हा पॅक चेहऱ्यावरील डाग दूर करण्याचे काम करतो.

दूध आणि हळद-

जर तुम्हाला वृद्धत्व थांबवायचे असेल तर तुम्ही दूध आणि हळदीचा फेस पॅक बनवू शकता. हा पॅक बनवण्यासाठी ३ चमचे दुधात एक चतुर्थांश चमचे हळद मिसळा. आता या पॅकने चेहऱ्याला मसाज करा. दूध सुकल्यावर १० मिनिटांनी चेहरा धुवा.

हळद आणि तांदळाचे पीठ-

जर तुमच्या डोळ्यांखाली काळी वर्तुळे असतील तर तांदळाचे पीठ, टोमॅटोचा रस आणि कच्च्या दुधात हळद मिसळून पॅक तयार करा. १५ मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर चेहरा धुवा. काही दिवसांनी तुम्हाला त्याचा परिणाम दिसेल.


हळद आणि गुलाबपाणी-

गुलाब पाण्यात हळद मिसळून लावल्यास चेहऱ्याची चमक वाढण्यास मदत होते. हा फेस पॅक बनवण्यासाठी तुम्हाला २ चमचे बेसन, अर्धा चमचा हळद आणि ३ चमचे गुलाबपाणी लागेल. ही पेस्ट त्वचेवर २० ते २५ मिनिटे लावून ठेवा आणि नंतर चेहरा धुवा.

# खिद्रापूर : अद्भुत खगोलशास्त्रीय प्रकाश पर्वाचे ठिकाण

खिद्रापूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातील एक छोटेसे गाव.. हे गाव कोल्हापूर शहरापासून साधारण ७० किमी अंतरावर आहे. खिद्रापूर म्हणजे अध्यात्म आणि मानवी सौंदर्याच्या मिलापावर लिहिलेली दगडातील कोरीव कविता आहे. खिद्रापूर येथील कोपेश्वर मंदिरात त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी एक अद्भुत घटना घडते.चंद्रप्रकाशाचा वर्तुळाकार कवडसा स्वर्गमंडपातील वर्तुळाकार झरोक्यामधून जमीनीवरील चंद्रशिलेसोबत तंतोतंत जुळतो.संपूर्ण भारतात हे प्रकाश पर्व प्रसिद्ध आहे. दिवाळीच्या दीपोत्सवात कोल्हापूर जिल्ह्यासाठी हे प्रकाश पर्व अध्यात्म आणि खगोलशास्त्रीय चमत्कार म्हणून हजारो वर्षांपासून चर्चेत आहे.

या प्रकाश-योगायोगाचा अनुभव घेण्यासाठी शेकडो पायांना खिद्रापूरच्या मंदिराची आठवण होते. दिवाळीनंतरच्या दीपोत्सवात कोल्हापूर व महाराष्ट्रासाठी ही एक पर्वणी असते. चंद्र प्रतिबिंबाचा हा सोहळा पाहण्यासाठी त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा येथून अनेक पर्यटक येतात. खगोलशास्त्रीय दृष्ट्या या अनुभूतीला वेगळे महत्त्व आहे.हजारो खगोलशास्त्रीय, देश विदेशातील छायाचित्रणातील मान्यवर या ठिकाणी दिवाळीनंतर येणाऱ्या पौर्णिमेला अर्थात त्रिपुरारी पौर्णिमेला मध्यरात्री एकत्रित येतात. काही क्षणांसाठी वास्तुशास्त्र आणि खगोलशास्त्रातील






अद्भुतता अनुभवण्यासाठी देशभरातील चिकित्सक अभ्यासक या ठिकाणी येत राहतात. त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरांपेक्षा खिद्रापूरचे मंदिर लक्षणीय ठरते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री मंदिरातील हजारो दिवे प्रज्वलित होतात, भजन-कीर्तन, नृत्य आणि दीपोत्सवाचे कार्यक्रम होतात. हजारो वर्षांपासूनचा हा उत्सव या ठिकाणी सुरु आहे.अध्यात्म आणि विज्ञान या ठिकाणी हातात हात घालून निसर्गाच्या अद्भुत चमत्काराला अनुभवते.

त्रिपुरारी पौर्णिमेच्या रात्री जेव्हा चंद्र या मंदिरातील स्वर्ग मंडपाच्या गोलाकार भागावर येतो त्या ठिकाणावरुन चंद्राचा पूर्ण प्रकाश त्याच आकाराच्या चंद्रशिलेवर पडतो. काही सेकंदांचा हा पूर्णतेचा आनंद असतो. अगदी खगोलशास्त्रज्ञांच्या घड्याळातून घेतलेल्या अंदाजानुसार केवळ सहा ते बारा सेकंदाचा हा परिपूर्ण गोलाकारांचा प्रकाशीय मिलाप असतो.

या दीपोत्सवासाठी ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराचे वास्तु शिल्प देखील अभ्यासनायोग्य आहे. देशभरातील शिल्प प्रेमी या मंदिराला कायम भेटी देत असतात. हे मंदिर कृष्णा नदीच्या काठी वसलेले आहे,त्यामुळे नद्याच्या प्रवाहाप्रमाणे सजीव व बोलक्या शिल्प सौंदर्याची अनुभूती मंदिराच्या परिसरात कायम येत राहते.

कोपेश्वर मंदिर हे प्रामुख्याने शिव (महादेव) आणि विष्णू यांना समर्पित आहे. मंदिराची उभारणी साधारणतः चालुक्य व शिलाहार राजवटीत सुरू झाली असावी असे ऐतिहासिक मत आहे. नंतर ११-१२ व्या शतकात शिलाहार व यदुवंशीय राजे यांनी मंदिराचा विस्तार केला. मंदिराला भारत सरकारद्वारे राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून मान्यता दिलेली आहे.

कोपेश्वर मंदिर हे शिल्पकलेचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ते शिलाहार शैली व मध्ययुगीन महाराष्ट्रातील मंदिरकलांचा संगम दर्शवते. मुख्य मंडप, आच्छादित मंडप, अंतराळ व गर्भगृह या भागांमध्ये मंदिर विभागलेले आहे. बाहेर एका मंडपावर ४८ खांब आहेत, हे मंडप ''स्वर्गमंडप'' म्हणून ओळखले जाते.

या ४८ खांबांच्या आत एक वर्तुळाकार खुली जागा आहे ही जागा होम, यज्ञ, हवन यासाठी राखून ठेवली गेली आहे, ज्यामुळे धूर बाहेर निघे. मात्र हेच प्रयोजन त्रिपुरारी पौर्णिमेला अद्भुत खगोलशास्त्रीय निमित्त ठरते.स्तंभांच्या आतील भागावर अनेक देव-देवतांची शिल्पे आहेत. या मंदिर परिसरात अनेक चित्रपटांचे चित्रीकरण झाले आहे.

मंदिराच्या शिखरापासून ते गर्भगृहापर्यंत अनेक लहान शिखरांची ओळ आहे, जी कलात्मकतेने सजवलेली आहे.

खिद्रापूरला येण्यासाठी अनेक मार्ग आहेत. सांगली मार्गे किंवा गावातील स्थानिक रस्ते वापरुन या ठिकाणी पोहोचता येते. कोल्हापूर पासून केवळ ७० किलोमीटर अंतरावर हे प्रख्यात कोपेश्वर मंदिर आहे.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# कवयित्री रेश्माई खरात यांच्या १२व्या पुण्यस्मरणानिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** विदर्भाच्या ''बहिणाबाई'' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि तिफन पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध कवयित्री तथा शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मातोश्री स्व.रेश्माई रामभाऊ खरात यांच्या १२व्या पुण्यस्मरणानिमित्त मेहकर–लोणार मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या जनसंवाद कार्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी न.प.सभापती भास्करराव गारोळे पाटील यांनी भूषविले.

या प्रसंगी काँग्रेस नेते अॅड. अनंत वानखेडे,( मेहकर विधानसभा समन्वयक) श्याम पाटील, युवा सेनेचे संदीप गारोळे, उपतालुकाप्रमुख रमेश बापू देशमुख, उटीचे सरपंच संजय



सुळकर, विठ्ठलवाडीचे सरपंच धनराज राठोड, काँग्रेस सेवादलाचे उपाध्यक्ष शैलेश बावस्कर, अशोकमामा तुपकर, अॅड. संदीप गवई, तालुका अध्यक्ष अमोल बोरे, लोणार तालुका महिला आघाडी प्रमुख तारामती जायभाये, मेहकर शहर अध्यक्ष पौर्णिमा गवई, संघटक नगमा गवळी, सुशीला मोरे, कवी तानाजी जाधव, सतीश देशमुख, नामदेव काटेकर, गणेश बोर्डे, रमेश अवसरमोल, राहुल चव्हाण, ज्ञानेश्वर राठोड, पिंटू जाधव, सुनील आडे, देवानंद जाधव, जगन्नाथ त्रिपाठ, सिद्धार्थ गवांदे, संजय नवले, विजय खरात, प्रविण सरदार, गणेश माळेकर, भागवत बोरकर, गणेश धोंडगे, वसंता घायवट, आकाश अवसरमोल, रफिक गवळी, किशोर आराख, पत्रकार रविंद्र वाघ, शाहिर देवानंद वानखेडे, पत्रकार पुरुषोत्तम बोर्डे, राजू गवई, वैभव देशमुख, शिवम लोणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी कवयित्री स्व.रेश्माई खरात यांच्या कवितांमधून समाजातील वास्तव मांडण्याच्या त्यांच्या अद्वितीय शैलीचा उल्लेख करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

''कवितेच्या माध्यमातून समाजमनाला जागवणाऱ्या रेश्माई ताईंचे कार्य प्रेरणादायी आहे,'' असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### कार्तिकी एकादशीच्या आधी पांडुरंगाच्या चरणी सोडला प्राण, पंढरपुरात प्रसिद्ध कीर्तनकारांचं निधन

**दैनिक आपला विदर्भ**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक; अंतीम मतदार यादी प्रसिद्ध

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांसाठीची मोताळा येथील अंतीम मतदार यादी आज, दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी मोताळा तहसील कार्यालयांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती मोताळा तहसिलदार यांनी कळविले आहे.

### जिल्ह्यातील खरीप हंगामाची सुधारीत पैसेवारी जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सन २०२५–२६ च्या खरीप हंगामातील बुलढाणा जिल्ह्यातील १ हजार ४२० गावाची सुधारीत पैसेवारी सरासरी ४९ पैसे इतकी जाहीर करण्यात आली आहे. यातील १ हजार १२२ गावांची खरीप हंगामाची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आहे. तर २९८ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

५० पैसेपेक्षा कमी अंतिम पैसेवारी असलेले गावे : बुलढाणा तालुक्यात ९८, चिखली येथे १४४, देऊळगाव राजा येथे ६४, मेहकर येथे १६१, लोणार येथे ९१, सिंदखेड राजा येथे ११४, मलकापूर येथे ७३, नांदुरा येथे ११२, खामगाव येथे १४६, जळगांव जामोद येथे ११९ असे एकूण १ हजार १२२ गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा कमी आहे.

५० पैसेपेक्षा जास्त अंतिम पैसेवारी असलेले गावे: मोताळा येथे १२०, शेगांव येथे ७३ व संग्रामपूर येथे १०५ असे एकूण २९८ गावे गावांची पैसेवारी ही ५० पैशांपेक्षा जास्त आहे.

### दोनचाकी वाहनांसाठी MH-28 CE नवी मालिका सुरु

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दोनचाकी वाहनांच्या नव्या नोंदणीसाठी परिवहन विभागाकडून MH-28 CE ही नवी मालिका सुरू करण्यात आली आहे. या मालिकेअंतर्गत पसंती क्रमांकासाठी अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया आज, दि. ३ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाली आहे.

सदर मालिकेतील क्रमांक MH-28 CE 0001 ते MH-28 CE 9999 पर्यंत उपलब्ध असून, वाहनमालकांना इच्छित पसंती क्रमांकासाठी निर्धारित शुल्कासह अर्ज करता येणार आहे. नव्या मालिकेच्या प्रारंभामुळे दोनचाकी वाहनधारकांना नोंदणीसाठी सुलभता मिळणार असून, जिल्ह्यातील वाढत्या वाहनसंख्येच्या पार्श्र्वभूमीवर ही नवी मालिका सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी दिली आहे.

### दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदी हेमराज बागुल रुजू



**नवी दिल्ली:** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या संचालकपदाचा कार्यभार संचालक हेमराज बागुल यांनी नुकताच स्वीकारला.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त तथा सचिव आर. विमला यांनी संचालक बागुल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. महाराष्ट्र परिचय केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी मनिषा पिंगळे यावेळी उपस्थित होत्या.

संचालक बागुल महासंचालनालयातील ज्येष्ठ संचालक असून ते मंत्रालयातील मुख्यालयात संचालक (प्रशासन) या पदावर कार्यरत होते. त्यांनी यापूर्वी मुख्यमंत्र्यांचे मुख्य जनसंपर्क अधिकारी तसेच महासंचालनालयाच्या नागपूर–अमरावती विभाग आणि छत्रपती संभाजीनगर लातूर विभागाच्या संचालकपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शासकीय सेवेत येण्यापूर्वी बागुल यांनी पत्रकारितेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. तसेच साहित्यविषयक विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनीही बागुल यांना सन्मानित करण्यात आले आहे.

# अनुसूचित जाती–जमाती शेतकऱ्यांना प्रति थेंब अधिक पिक योजना; ९० टक्केपर्यंत अनुदानाचा लाभ

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राष्ट्रीय कृषि विकास योजना ''प्रति थेंब अधिक पीक'' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचनासाठी ९० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभ मिळणार आहे. इच्छुक पात्र अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करुन योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी उपसंचालक ए.बी. गावडे यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजन प्रति थेंब अधिक पिक(सूक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत निवड झालेल्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) अंतर्गत पुरक अनुदानानुसार ९० टक्के अनुदानाचा लाभ देण्यात येणार आहे.

शासन पत्र क्र. डीबीटी–०३२४/प्र.क्र.७१/१४ अ. दि. १० जून २०२४ नुसार, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील अल्प व अत्यल्प भुधारक लाभार्थ्यांना अनुक्रमे २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पुरक अनुदान मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून देण्यात येणार आहे. उर्वरित १० ते १५ टक्के अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना तसेच बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना मधून अदा करण्यात येईल. यामुळे पात्र शेतकऱ्यांना मंजूर मापदंडानुसार एकूण ९० टक्क्यांपर्यंत अनुदानाचा लाभ मिळणार आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज सादर करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी सुवर्णसंधी

**दैनिक आपला विदर्भ**

### बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. १० ते १४ नोव्हेंबर २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हैस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ६० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. १४ नोव्हेंबरपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालय जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ८२७५०९३२०१/९०११५७८८५४ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.

# मायसामध्ये रश्मिका मंदान्ना मुख्य भूमिका साकारणार, श्रीवल्ली पहिल्यांदा करणार ॲक्शन...



**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** साऊथ अभिनेत्री रश्मिका मंदान्ना मायसामध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे. रश्मिकाच्या नवीन शक्तिशाली लूक आणि त्याच्या मनोरंजक कथेमुळं सध्या चर्चेत आहे. मायसामध्ये रश्मिका अॅक्शन करतानाही दिसणार आहे. दिवाळीच्या निमित्तानं, मायसाच्या निर्मात्यांनी चित्रपटाचे एक नवीन मोशन पोस्टर रिलीज केलं होतं. यामध्ये रश्मिका एका शक्तिशाली अवतारात दिसत होती. अलीकडच्या मुलाखतीत रश्मिकानं सांगितलं की तिला अॅक्शन चित्रपटांमध्ये काम करायला आवडते. ती म्हणाली, ''मला अॅक्शन सिनेमा करायला आवडते आणि मी सध्या मायसानावाचा चित्रपट करत आहे.

मायसा चित्रपटाबद्दल रश्मिकानं दिली माहिती : मायसासाठी आणखी उत्साह वाढवण्यासाठी, निर्मात्यांनी खुलासा केला की, चित्रपटातील एक खास झलक लवकरच चाहत्यांसाठी प्रदर्शित केली जाणार आहे. मायसा या वर्षातील सर्वात रोमांचक चित्रपटांपैकी एक




बनत आहे. दरम्यान मायसाच्या निर्मात्यांनी शेअर केल्या पोस्टरमध्ये रश्मिका मंदान्ना एका आश्चर्यकारक नवीन लूकमध्ये दिसत आहे. रक्तानं माखलेला चेहरा, उघडे केस आणि हातात तलवार घेऊन, रश्मिका एका आश्चर्यकारक नवीन लूकमध्ये धमाकेदार दिसत आहे. अनफॉर्म्युला फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मित आणि रवींद्र पुले दिग्दर्शित, मायसा हा जंगलात राहणाऱ्या लोकांच्या कथेवर आधारित एक भावनिक अॅक्शन चित्रपट आहे. या चित्रपटात सुंदर दृश्ये, हृदयस्पर्शी कथा आणि रश्मिकाचा उत्कृष्ट अभिनय प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे.

रश्मिका मंदान्नाचं वर्कफ्रंट : मायसा या चित्रपटामध्ये रश्मिका मंदान्नाचा एक वेगळा अंदाज चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. दरम्यान अनफॉर्म्युला फिल्म्सच्या बॅनरखाली निर्मित मायसा चांगली कमाई करेल असा अंदाज आता अभिनेत्रीचे चाहते करत आहेत. तसेच रश्मिकाच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, तिचा थामा हा चित्रपट सध्या चित्रपटगृहांमध्ये सुरू आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करत आहेत. या चित्रपटामध्ये तिच्याबरोबर आयुष्मान खुराना, नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावल हे कलाकार आहेत. याशिवाय ती पुढं द गर्लफ्रेंट, पुष्पा ३: द रॅम्पेज आणि एए २२ या चित्रपटांमध्ये दिसणार आहे.

# महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियाना'ला गती मंत्री आदिती तटकरे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील प्रत्येक महिलेच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'आदिशक्ती अभियाना'ला राज्यभर गती मिळत आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील ३५१ तालुका आणि २६ हजार ५९ ग्रामस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असून, या समित्यांचे प्रशिक्षण आणि अभियानाची कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.



'आदिशक्ती अभियान व पुरस्कार योजने' च्या अंमलबजावणीसंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक झाली, यावेळी मंत्री तटकरे यांनी विभागनिहाय आढावा घेतला. यावेळी विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, सहसचिव वि.रा. ठाकूर, सहआयुक्त राहूल मोरे, अवर सचिव सुनील सरदार उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागाचे आयुक्त, एकात्मिक बालविकास विभागाचे आयुक्त कैलास पगारे, तसेच छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण, नागपूर आणि अमरावती विभागांचे विभागीय आयुक्त सहभागी झाले होते.

मंत्री तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय सक्षमीकरणासाठी 'आदिशक्ती अभियान' महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. या माध्यमातून महिला बचतगटांचे सक्षमीकरण, महिला सुरक्षा व न्यायप्रवेश, आरोग्य व पोषण जनजागृती, शैक्षणिक व व्यावसायिक उन्नती, नेतृत्व विकास आणि सामाजिक सहभाग वाढविण्यावर भर दिला जात आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबतची जनजागृती ग्रामस्तरावरील प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचविणे हे ध्येय ठेवले आहे.

जिल्हा, तालुका आणि ग्रामस्तरीय समित्यांचे प्रशिक्षण तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश मंत्री तटकरे यांनी संबंधित विभागीय आयुक्तांना दिले.

'ग्रामसमृद्धी योजने'च्या धर्तीवर ग्रामसभांमध्ये या अभियानाच्या प्रसारासाठी कार्यवाही करावी, तसेच योजनेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी माहिती पुस्तिका तयार करण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.